मो.अ.नु.भ.अर्ज क्र.३१/२०२३

मनिषा सुकदेव पवार व एक जण —— अर्जदार
विरुध्द
अन्सारी रुस्तम अली शौकत अली व एक जण —— सामनेवाले

**MHNS070001692023**

**निशाणी क्र.०५ वरील हुकुम**

१. प्रस्तुतचा अर्ज हा दि.०२/०२/२०२२ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातात सुकदेव श्रावण पवार यांच्या झालेल्या मृत्यु प्रकरणी मोटार वाहन कायदा कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले की, सुकदेव श्रावण पवार हे मृत्युसमयी २९ वर्षाचे होते. दिनांक ०२/०२/२०२२ रोजी रात्री १०.३० वा. चे सुमारास ते मोटारसायकल क्र.एम.एच.—४१—एएक्स—३६१३ ने त्यांचा भाचा राहुल शाम वाघ याचेसोबत शिरसमणी येथुन चांदवड येथे जात असतांना उमराणे गावाजवळी पाठीमागुन येणारी मोटारसायकल क्र. एम.एच.—४१—एजे—०४३४ वरील चालकाने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, हयगईने चालवुन मयताला ठोस मारल्याने अपघात झाला. सामनेवाला क्र.१ हे सदर वाहनाचे मालक व चालक होते. सामनेवाला क्र.२ यांचेकडे त्याचा विमा उतरविण्यात आला आहे. अपघातानंतर मयत सुकदेव श्रावण पवार यांना रुग्णालयामध्ये उपचाराकरीता दाखल करण्यात आले असता वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना मृत घोषित केले. सदरचा अपघात सामनेवाला क्र.१ ने त्याच्या ताब्यातील वाहन हे निष्काळजीपणे व रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविल्याने झाला आहे.

३. सामनेवाला क्र.१ यांच्याविरुध्द प्रकरण विना जबाब आदेश करुन चालविण्यात आले.

४. सामनेवाला क्र.२ यांनी मुळ अर्ज आणि अंतरिम नुकसान भरपाईच्या अर्जास जबाब दाखल केलेला असुनतो निशाणी क्र.११ वर आहे. सामनेवाला क्र.२ यांनी

अर्जातील कथने नाकारलेली आहेत. सामनेवाला हे असे कथन करतात की, अपघात हा मयत सुकदेव श्रावण पवार यांच्या चुकीमुळे झालेला आहे. सदर अपघातास मयत सुकदेव श्रावण पवार हेच जबाबदार आहेत. त्यामुळे सामनेवाला क्र.२ हे नुकसान भरपाई रक्कम देणे लागत नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.२ हे अर्ज नामंजुर करावा अशी मागणी करतात.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. तसेच कागदपत्रांची पाहणी केली. अभिलेखावरील पोलीस पेपर, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल यावरुन असे दिसुन येते की, दि. ०२/०२/२०२२ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातात मयत सुकदेव श्रावण पवार यांचा अपघातात झालेल्या जखमांमुळे मृत्यु झाला आहे.

६. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र नि.क्र.०६ वर दाखल केले आहे. तसेच नि.क्र.०३ सोबत फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, विमा प्रमाणपत्र असे कागदपत्र दाखल केले आहेत.

७. मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे उपकलम २ कलम १४० नुसार मृत्यु झाल्यास अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम ही रुपये ५०,०००/— अशी ठरविलेली आहे. तसेच कलम १४० चे उपकलम ३ नुसार अर्जदार यांना सदर अपघात हा कोणाच्या चुकीच्या कृतीमुळे, निष्काळजीपणामुळे व वाहन चालकाच्या कमतरतेमुळे झाला याबाबत कथन करुन ते शाबीत करण्याची जबाबदारी नाही. वरील सर्व बाबींचा तसेच या केसमधील घटनांचा मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे कलम १४० प्रमाणे विचार करता मी या मतास आलो आहे की, अर्जदार यांना वरील अर्जात नमुद केलेल्या अपघातात सुकदेव श्रावण पवार यांच्या मृत्यु प्रकरणी अंतरिम नुकसान भरपाई रक्कम रुपये ५०,०००/— मिळण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश निर्गमित करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्र.०५ मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाले क्र.१ व २ यांनी संयुक्तरित्या व वैयक्तीकरित्या अंतरिम नुकसान भरपाई पोटी रक्कम रुपये ५०,०००/— (रुपये पन्नास हजार मात्र) हे सर्व अर्जदार यांना संयुक्तरित्या समप्रमाणात आजपासुन एक महीन्याचे आत दयावी.

३. सामनेवाला यांनी वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम वरील नमुद केलेल्या कालावधीत न भरल्यास आदेशाचे तारखेपासुन ते रक्कम पुर्ण वसुल होईपावेतो त्यावर वार्षिक ७ टक्केप्रमाणे व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहतील.

४. वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम भरल्यानंतर ती अर्जदार यांना रेखांकित धनादेशाने अदा करण्यात यावी.

SUDHIR BABURAO BHAJIPALE

Digitally signed by SUDHIR BABURAO BHAJIPALE
Date: 2023.07.24 12:57:07 +0530

**दि.२४/०७/२०२३.**
**मालेगाव**

**(सुधीर बा. भाजीपाले)**
**सदस्य**
**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,**
**मालेगाव, जि. नाशिक**